Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

# ग्राम पशुसंवर्धन विस्तारसंघ
## पशुसंवर्धन विस्तार महिला ग्रामसंपर्क कार्यकर्ती-

प्रस्तावना

महाराष्ट्र कृषि स्पर्धाक्षम प्रकल्पांतर्गत महाराष्ट्रातील मोठ्या जनावरांचे २० बाजार व शेळ्या मेंढ्यांच्या चार बाजारांचे बळकटीकरण/आधुनिकीकरण उपघटकाची अंमलबजावणी सन २०११-१२ ते २०१५-१६ या कालावधीत करण्यात यावी. या बाजारांच्या लाभक्षेत्रातील जिल्ह्यांत पशुसंवर्धन विस्तार महिला ग्रामसंपर्क कार्यकर्तीची नेमणूक करण्यात यावी अशा रितीने प्रकल्प कालावधीमध्ये एकुण २५०० महिला ग्रामसंपर्क कार्यकर्त्यांची नेमणूक करण्यात यावी.

राज्यात पशुसंवर्धन खात्यामध्ये विस्तार विषयक काम करण्यासाठी प्रत्येक तालुक्याच्या पंचायत समितीमध्ये पशुधन विकास अधिकारी (विस्तार) व पशुधन पर्यवेक्षक यानुसार कर्मचारी-वर्ग कार्यरत आहे. तालुक्याचे विस्तारलेले भौगोलिक क्षेत्र लक्षात घेता तालुक्यातील गावांची संख्या, राबविण्यात येणाऱ्या पशुसंवर्धन विषयक विविध योजना, या योजनांचा पाठपुरावा योजनेतील लाभार्थींची निवड, योजनेविषयीची माहिती आजारी जनावरांना औषधोपचार तसेच पशुधन व्यवस्थापना विषयीची माहिती ही सर्व कामे सध्या वरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना करावी लागतात त्यामुळे साहजिकच या कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण येतो व योजना सर्व गाव स्तरांपर्यंत पोहचविण्यासाठी विलंब होतो.

यामुळे अपेक्षित विस्तार कामे गुणात्मक दर्जा राखून परिणामकारकरित्या राबविण्यासाठी तालुक्यातील गावांची ग्रामसमुहात विभागणी करुन प्रत्येक पाच गावाच्या एका समुहासाठी एक पशुसंवर्धन विस्तार महिला ग्रामसंपर्क कार्यकर्तीची निवड करुन त्यांच्या माध्यमातून वरील सर्व कामे करुन घेण्यात यावी. ज्यायोगे सदर कार्यकर्त्या पशुसंवर्धन खाते व पशुपालक यांच्यामध्ये दुवा म्हणून काम करावे.

सदरच्या उपघटकाची अंमलबजावणी दोन स्तरावर करण्यात यावी.

१) प्रकल्प अंमलबजावणी कक्षामार्फत प्रति महिला कार्यकत्यांना रु.२५००/- मूल्याचे लसपेटिका व आनुषंगिक साहित्य पुरवठा करण्यात यावे.

२) तालुका पातळीवर प्रति महिला कार्यकत्यांना रु.१५००/- मूल्याचे तीन दिवसांचे प्रशिक्षण देण्यात यावे

१.अ) पशुसंवर्धन विस्तार महिला ग्रामसंपर्क कार्यकत्यांना साहित्य पुरवठा (प्रति रु.२५००/-)

उपघटकाचे कार्यक्षेत्र, उपघटक राबविण्याचा कालावधी

महाराष्ट्र कृषि स्पर्धाक्षम प्रकल्पांतर्गत सन २०११-१२ ते २०१५-१६ या कालावधीत राज्यातील मोठ्या जनावरांचे २० बाजार व शेळ्या मेंढ्यांच्या चार बाजारांचे या प्रकल्पांतर्गत बळकटीकरण/आधुनिकीकरण करण्यात येणार आहे. जनावरांच्या या बाजाराच्या लाभक्षेत्रातील जिल्ह्यात प्राधान्याने जनावरांच्या बाजाराच्या नजीकचे तालुके अथवा ज्या ठिकाणी परसातील कुक्कुट पक्षी तसेच शेळ्या-मेंढ्यांची संख्या पुरेशा प्रमाणात आहे, अशा ठिकाणी पशुसंवर्धन विस्तार महिला ग्रामसंपर्क कार्यकर्त्यांची नेमणूक करण्यात यावी. अशा रितीने प्रकल्प कालावधीमध्ये एकुण २५०० महिला ग्रामसंपर्क कार्यकर्त्यांची नेमणूक करण्यात यावी.

उपघटकाचे स्वरुप व अंमलबजावणीची कार्यपध्दती

प्रकल्पांतर्गत निवडलेल्या जनावरांच्या बाजाराच्या लाभक्षेत्रातील जिल्ह्यात पशुसंवर्धन विस्तार महिला ग्रामसंपर्क कार्यकर्त्यांची नेमणूक करण्यात यावी प्रकल्पांतर्गत निवडलेल्या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील प्राधान्याने जनावरांच्या बाजाराच्या नजीकचे तालुके अथवा ज्या ठिकाणी परसातील कुक्कुट पक्षी तसेच शेळ्या-मेंढ्यांची संख्या पुरेशा प्रमाणात आहे, अशा ठिकाणी पशुसंवर्धन विस्तार महिला ग्रामसंपर्क कार्यकर्त्यांची नेमणूक करण्यात यावी.

संबंधित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती विस्तार यांनी तालुक्यातील ग्रामसमूहाची विभागणी वरील निकषावर करावी. पशुसंवर्धन विस्तार महिला ग्रामसंपर्क कार्यकर्त्यांची निवड ग्रामसमुहाच्या नजिकच्या प्रभारी पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी १ अथवा २ चे अधिकारी/कर्मचारी यांनी ग्रामसभेच्या संमतीने सध्या अस्तित्वात असलेल्या/कार्यरत बचत गटाच्या सदस्यांतून करावी. त्यासाठी तालुका पशुधन विस्तार

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

अधिकाऱ्यामार्फत सदर कार्यकर्तीचा नावानिशी नियुक्तीचा प्रस्ताव (परिशिष्ट-१ प्रमाणे) शिफारसीसह जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी/जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचेकडे पाठविणेत यावा. त्यानुसार जिल्हा पातळीवर निवड समितीमार्फत सदर प्रस्तावास अंतिम मंजूरी देण्यात यावी.

निवडलेल्या महिला कार्यकर्तींना तालुकापातळीवर पशुधन विकास अधिकारी विस्तार व आत्मा यांच्या संयुक्त विद्यामाने तीन दिवसाचे प्रशिक्षण देण्यात यावे.

प्रशिक्षणानंतर प्रत्येक पशुधन विस्तार महिला कार्यकर्तीस खालील साहित्याचा संच देण्यात यावा. १. लसपेटिका २. अनुषंगिक लसीकरण साहित्य (सिरींजेस) ३. भ्रमणध्वनी

निवडलेल्या ग्रामसमुहातील पाच गावातील परस बागेतील कुक्कुट पक्षी तसेच शेळ्या व मेंढ्यांची पशुपालक-निहाय माहिती अद्ययावत ठेवणे व यादी तयार करणे, सदर पक्ष्यांना लसीकरण करणे व जंतनाशक औषध पाजणे तसेच शेळ्या-मेंढ्यांना जंतनाशके औषधे पाजणे, व्यवस्थापनाविषयी सुचना व मार्गदर्शन करणे. गोचिड गोमाशी निर्मुलन विषयक सुचना व मार्गदर्शन देणे पशुजन्य विषयक उत्पादीत उत्पादनांच्या बाजारभावाची अद्ययावत माहिती देणे तसेच पशुसंवर्धन विषयक योजनांची माहिती देणे व लाभार्थ्यांना लाभ घेण्यास उद्युक्त करणे इ. या सर्व सेवा पशुधन विस्तार महिला ग्रामसंपर्क कार्यकर्त्यांनी विहीत फी आकारुन देण्यात याव्यात.

महिला विस्तार कार्यकर्त्यांनी दर महिन्याच्या २० तारखेस केलेल्या कामाचा अहवाल (परिशिष्ट-३ प्रमाणे) नजिकच्या पशुवैद्यकिय दवाखाना यांचेकडे देण्यात यावा. परिसरासाठी लागणारी जंतनाशके व लस यांची मागणी संबंधित दवाखान्याकडे करण्यात यावी. जेणेकरुन निवडलेल्या माहिला पशुधन विस्तार ग्रामसंपर्क कार्यकर्तीमार्फत पशुसंवर्धन विषयक योजना लसीकरण व परसातील कुक्कुट पक्षी व्यवस्थापनाची माहिती ग्रामसमुहातील सर्व पशुधन पालकांपर्यंत परिणामकारकरित्या पोहचविण्यात येईल. अशा रितीने अंतिमतः पशुपालकांचे जीवनमान उंचविण्यास मदत होईल.

माहिला (पशुधन विस्तार) ग्रामसंपर्क कार्यकर्त्यांची निवड

या उपघटकांतर्गत निवडलेल्या जिल्ह्यातील जनावरांच्या बाजाराच्या लाभक्षेत्रात प्रति पाच गावांची समुहात विभागणी करुन प्रत्येक पाच गावाच्या एका ग्रामसमुहासाठी एक पशुधन विस्तार महिला ग्रामसंपर्क कार्यकर्तीची नियुक्ती करण्यात यावी. ग्रामसमुहाच्या नजिकच्या प्रभारी पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी १ अथवा २ येथील अधिकारी/कर्मचारी यांनी ग्रामसभेच्या संमतीने सध्या अस्तित्वात असलेल्या/कार्यरत बचत गटाच्या सदस्यातून महिला ग्रामसंपर्क कार्यकर्तीची निवड करावी. त्यासाठी तालुका पशुधन विस्तार अधिकाऱ्यामार्फत सदर कार्यकर्तीच्या नियुक्तीचा प्रस्ताव शिफारसीसह जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचेमार्फत जिल्हा निवड समितीकडे यांचेकडे पाठविण्यात यावा. जिल्हा निवड समितीने या प्रस्तावास अंतिम मंजूरी देऊन निवड प्रक्रिया पुर्ण करावी.

माहिला (पशुधन विस्तार) ग्रामसंपर्क कार्यकर्त्यांच्या निवडीचे निकष

महिला (पशुधन विस्तार) ग्रामसंपर्क कार्यकर्त्यांचे निवडीचे निकष खालीलप्रमाणे राहतील.

१) निवडलेली महिला (पशुधन विस्तार) ग्रामसंपर्क कार्यकर्ती निवडलेल्या ग्रामसमुहांपैकी कोणत्याही एका गावातील कायमची रहीवासी असली पाहीजे. (ग्रामपंचायत रहिवासी दाखला)
२) सदर कार्यकर्तीचे वय १८ ते ४० वर्षाचे दरम्यान असावे. (वयाचा दाखला)
३) सदर कार्यकर्तीस लिहिता व वाचता येणे गरजेचे आहे. (शैक्षणिक अर्हता दाखला)
४) सदर कार्यकर्तीकडे संभाषण कौशल्य असणे आवश्यक आहे.
५) सदर कार्यकर्तीकडे स्वतःची जनावरे / कुक्कुट पक्षी असणे आवश्यक आहे तसेच पशुपालन व्यवस्थापनाची प्राथमिक माहिती व पशुपालनाची आवड असणे आवश्यक आहे.
६) सदर कार्यकर्ती सध्या अस्तित्वात असलेल्या कार्यरत बचत गटाची सदस्य असणे आवश्यक आहे.

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

उपघटकाचे अंदाज पत्रक

एकुण २५०० महिला ग्रामसंपर्क कार्यकर्त्यांची नेमणूक करण्यात यावी. यानुसार प्रतिवर्ष खाली नमुद केलेल्या तपशिलानुसार महिला ग्रामसंपर्क कार्यकर्त्यांची नेमणूक करण्यात यावी. या ग्रामसंपर्क कार्यकर्तींना प्रशिक्षण देऊन तसेच आवश्यक निविष्ठा देऊन विस्तार कार्य करुन घेण्यात यावे. या प्रित्यर्थ प्रति कार्यकर्ती येणारा खर्च खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | बाब | | प्रस्तावित खर्च (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | लस पेटी पुरवठा व अनुषंगिक साहित्य. (भ्रमण ध्वनी संच, सिम कार्ड, दहा मिली व दोन मिली क्षमतेच्या १०० सिरींजेस) | : | २,५००.०० |

सोबत महिला ग्रामसंपर्क कार्यकर्त्यांच्या नियुक्तीबाबत जिल्हावार व वर्षवार लक्ष्य सोबत जोडले आहे.
वर्षनिहाय प्रस्तावित खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे राहील.

| वर्ष | तरतूद (रुपये लाखात) | महिला कार्यकर्त्यांची संख्या. |
|---|---|---|
| सन २०११-१२ | ०३.७५ | १५० . |
| सन २०१२-१३ | ५.१२५ | २०५ |
| सन २०१३-१४ | ७.५० | ३०० |
| सन २०१४-१५ | २३.१० | ९२४ |
| सन २०१५-१६ | २३.०२५ | ९२१ |
| एकुण:- | ६२.५० | २५०० |

उपघटकाचे संनियंत्रण.

ग्रामसमुह पातळीवर नजिकच्या पशुवैद्यकिय संस्थेतील पशुधन विकास अधिकारी / सहाय्यक पशुधन विकास अधिकारी / पशुधन पर्यवेक्षक यांनी संनियंत्रण करावे. तालुका पातळीवर पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती व जिल्हा पातळीवर संबंधित जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी संनियंत्रण करावे. तसेच विभागिय पातळीवर प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त आणि राज्य पातळीवर अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदर योजनेचे संनियंत्रण करावे.

उपघटकाची फलनिष्पत्ती

प्रकल्प कालावधीमध्ये राज्यातील निवडलेल्या १८ जिल्ह्यातील १०००० गावातून पशुधन विस्तार व्यवस्थापनाचे जाळे २५०० नियुक्त महिला (पशुधन विस्तार) ग्रामसंपर्क कार्यकर्त्या मार्फत प्रस्थापित केले जाईल. त्यायोगे या पशुधन विस्तार व्यवस्थापनामुळे या भागातील सर्व गावापर्यंत पशुधन विस्तार पशुसंवर्धन विषयक योजना परसातील कुक्कुट पालन व्यवस्थापन शेळी व मेंढी व्यवस्थापन प्रचलित पशुधन उत्पादीत मालाचे अद्ययावत बाजारभाव तसेच जनावराच्या बाजाराविषयीची अद्ययावत माहिती जनावराच्या किमतीची अद्यावत माहिती तात्काळ रोगनिदान इत्यादीचा फायदा या भागातील पशुपालकांना होणार आहे. जेणेकरुन त्यांचे जीवनमान उंचविणार आहे व या सर्व सेवा सदर कार्यकर्त्यांमार्फत सशुल्क असल्यामुळे सदर कार्यकर्त्यांच्या नियुक्तीवर शासनास कोणताही वित्तीय भार येणार नाही.

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

## १.ब ) पशुधन विस्तार महिला ग्रामसंपर्क कार्यकर्ती या उपघटकाच्या अमंलबजावणी पध्दत

- या उपघटकांच्या अंमलबजावणी करताना खालील निकषांचे पालन करण्यात यावे.

१. निवडलेली महिला (पशुधन विस्तार) ग्रामसंपर्क कार्यकर्ती निवडलेल्या ग्रामसमुहांपैकी कोणत्याही एका गावातील कायमची रहीवासी असली पाहीजे. (ग्रामपंचायत रहिवासी दाखला)

२. सदर कार्यकर्तीचे वय १८ ते ४० वर्षाचे दरम्यान असावे. (वयाचा दाखला)

३. सदर कार्यकर्तीस लिहिता व वाचता येणे गरजेचे आहे. (शैक्षणिक अर्हता दाखला किमान चौथी इयत्ता उत्तिर्ण असणे आवश्यक, तथापि पुरेशे अर्ज प्राप्त न झाल्यास शैक्षणिक अर्हता शिथील क्षम)

४. सदर कार्यकर्तीकडे संभाषण कौशल्य असणे आवश्यक आहे.

५. सदर कार्यकर्तीकडे स्वत:ची जनावरे/कुक्कुट पक्षी असणे आवश्यक आहे तसेच पशुपालन व्यवस्थापनाची प्राथमिक माहिती असणे आवश्यक आहे.

६. सदर कार्यकर्ती सध्या अस्तित्वात असलेल्या कार्यरत बचत गटाची सदस्य असणे आवश्यक आहे.

- जिल्हास्तरीय निवड समिती

| | |
|---|---|
| § जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त | अध्यक्ष |
| § जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी | सदस्य |
| § सहा. आयुक्त पशुसंवर्धन जिल्हा पशुसर्वचिकीत्सालय | सदस्य |
| § सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय | सदस्य सचिव. |

§ उपघटकाच्या अंमलबजावणीची रुपरेषा

१. जिल्ह्यातील जनावराच्या बाजाराच्या लाभक्षेत्रातील ज्या गावांमध्ये परसातील कुक्कुट पक्षी व शेळ्या मेंढ्यांची संख्या पुरेशी आहे अशा पाच गावांचा एक ग्रामसमुह तयार करुन अशाप्रकारे तालुक्यातील प्रत्येक ग्रामसमुहातून योजना/विस्तार कार्य राबविण्यात यावे.

२. निवडलेल्या ग्रामसमुहातून प्रत्येक गावातून एक याप्रमाणे जास्तीत जास्त पाच महिला कार्यकर्तींचे प्रस्ताव स्विकारण्यात यावेत. निवड समितीने या प्रस्तावांतून अंतिमरित्या एका कार्यकर्तीची निवड करावी. उर्वरित उमेदवार पर्यायी स्वरूपात निवड करून ठेवावेत. जेणेकरून कांही अपरिहार्य कारणामुळे नियुक्त केलेल्या कार्यकर्तीने काम करण्यास नकार दिल्यास प्रस्ताव नामंजूर झाल्यास, अथवा निवडीनंतर काम करण्यास असमर्थता दर्शविल्यास दुसऱ्या प्रस्तावानुसार निवड करावी.

३. निवड केलेल्या कार्यकर्तीने १००/- रुपये किमतीच्या स्टॅम्प पेपरवर बंधपत्र तयार (परिशिष्ट-२ प्रमाणे) करुन देणे बंधनकारक राहील.

४. निवड केलेल्या कार्यकर्तीने ठरवून दिलेल्या सेवांकरिता आकारावयाच्या विहीत फी आकारणे बंधनकारक आहे. या पेक्षा जास्त फी आकारता येणार नाही.

५. निवड केलेल्या कार्यकर्तीस कोणत्याही परिस्थितीत या योजनेतून शासनाकडून मानधन/मेहनताना वा कामाचा मोबदला म्हणून वित्तीय सहाय्य देण्यात येणार नाही. व कोणत्याही प्रकारे शासकीय नोकरी मागण्याचा हक्क राहणार नाही.

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

१.क ) पशुधन विस्तार महिला ग्रामसंपर्क कार्यकर्त्यांनी करावयाचे कामकाज

१. किमान तंत्रज्ञानावरील खालील बाबींची पशुपालकांना माहिती देणे -
   - स्वच्छ गोठा व्यवस्थापन व शेणाची जैविक विल्हेवाट
   - वाळवीचा कोंबड्यांचे खाद्य म्हणून उपयोग करणे
   - खाण्यायोग्य शेवाळ उत्पादन कार्यक्रम (अझोला)
   - सफल अंड्यांची तपासणी करणे
   - इतर अनुषंगिक कामे

२. पशुसंवर्धन विषयक खालील योजना राबविणेस सहाय्य करणे
   - वैरण बियाणे वाटप योजना
   - मोठ्या जनावरांचे लसीकरण ( शिबीरांमध्ये )
   - पशुसंवर्धन विषयक विविध योजनांच्या लाभार्थीची निवड तसेच लाभार्थीना वाटप केलेल्या जनावरांची/कुक्कुट पक्षांची पडताळणी व पाठपुरावा करणे.
   - ग्रामसमुहातील पशुधन आणि कुक्कुट पक्षी मरतुकीविषयी माहिती घेणे व प्रतिबंधकात्मक उपाययोजनांची माहिती देणे
   - सफल/उबवण्याची अंडी वाटप कार्यक्रम
   - विस्तार विषयक सर्व कामात मदत करणे व इतर अनुषंगिक कामे

३. व्यवस्थापनाविषयक कामकाजाची सुची
   - परसातील कोंबड्यांना लसीकरण करणे
   - परसातील कोंबड्यांना/शेळ्या मेंढ्यांना जंतनाशके पाजणे
   - जनावरांचे गोठे व पक्षांचे खुराडे यांचे निर्जंतुकीकरण करणे, गोचीड/ गोमाशी निर्मुलन करणे
   - प्राणीजन्य उत्पादीत मालाची अद्ययावत बाजाराभावांची माहिती देणे .
   - शेळ्या / मेंढ्यांतील परजीवींचे व बाह्य किटकांचे नियंत्रण करणे
   - इतर अनुषंगिक कामे

वरील सर्व कामाचा अहवाल दर महिन्याच्या २० तारखेपर्यंत विहीत नमुन्यात नजीकच्या पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी १ /२ यांना देणे. नजिकच्या पशुवैद्यकिय दवाखाना/पशुधन विकास अधिकारी विस्तार यांच्या संपर्कात राहून विस्तार कार्य अंमलबजावणीस सहाय्य करणे.

-------------------------------

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

## १. ड) पशुसंवर्धन विस्तार ग्रामसंपर्क कार्यकर्ती नेमणूकीचे जिल्हानिहाय भौतिक उद्दिष्ट

| अ. क्र. | मोठया जनावरांचे बाजार (गाय + म्हैस) | | एकुण भौतिक उद्दिष्ट | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बाजाराचे नाव | जिल्हा | | | | | | |
| १ | चांदुर बाजार | अमरावती | १०४ | २५ | २० | २० | २० | १९ |
| २ | करंजा | वाशिम | १०४ | २५ | २० | २० | २० | १९ |
| ३ | पुसद | यवतमाळ | १०५ | २५ | २० | २० | २० | २० |
| ४ | मेहकर | बुलढाणा | १०४ | २५ | २० | २० | २० | १९ |
| ५ | नेवासा | अहमदनगर | १०४ | २५ | २० | २० | २० | १९ |
| ६ | कर्जत (शेळी मेंढी बाजार) | अहमदनगर | १०४ | २५ | २० | २० | २० | १९ |
| | टप्पा क्र. १ एकूण | | ६२५ | १५० | १२० | १२० | १२० | ११५ |
| ७ | सावनेर | नागपुर | १०४ | ० | १४ | ३० | ३० | ३० |
| ८ | लाखनी | भंडारा | १०४ | ० | १४ | ३० | ३० | ३० |
| ९ | आमगाव | गोंदिया | १०४ | ० | १४ | ३० | ३० | ३० |
| १० | कडा | बीड | १०५ | ० | १५ | ३० | ३० | ३० |
| ११ | सांगोला | सोलापुर | १०४ | ० | १४ | ३० | ३० | ३० |
| १२ | अकलुज | सोलापुर | १०४ | ० | १४ | ३० | ३० | ३० |
| | टप्पा क्र. २ एकूण | | ६२५ | ० | ८५ | १८० | १८० | १८० |
| १३ | पिंपळगाव बसवंत | नाशिक | १०४ | ० | ० | ० | ४२ | ४२ |
| १४ | पाचोरा | जळगाव | १०४ | ० | ० | ० | ५२ | ५२ |
| १५ | अंमळनेर | जळगाव | १०४ | ० | ० | ० | ५२ | ५२ |
| १६ | शिरपुर | धुळे | १०५ | ० | ० | ० | ५२ | ५२ |
| १७ | वसई | ठाणे | १०५ | ० | ० | ० | ५२ | ५३ |
| १८ | खेड | पुणे | १०४ | ० | ० | ० | ५२ | ५३ |
| १९ | लोणंद | सातारा | १०४ | ० | ० | ० | ५२ | ५२ |
| २० | सांगली | सांगली | १०४ | ० | ० | ० | ५२ | ५२ |
| २१ | वडगाव पेठ | कोल्हापुर | १०४ | ० | ० | ० | ५२ | ५२ |
| २२ | आटपाडी (शेळी मेंढी बाजार) | सांगली | १०४ | ० | ० | ० | ५२ | ५२ |
| २३ | दौंड (शेळी मेंढी बाजार) | पुणे | १०४ | ० | ० | ० | ५२ | ५२ |
| २४ | दहीवडी (शेळी मेंढी बाजार) | सातारा | १०४ | ० | ० | ० | ५२ | ५२ |
| | टप्पा क्र. ३ एकूण | | १२५० | ० | ० | ० | ६२४ | ६२६ |
| | एकुण | | २५०० | १५० | २०५ | ३०० | ९२४ | ९२१ |

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

१. इ) महिला (पशुसंवर्धन विस्तार) ग्रामसंपर्क कार्यकर्ती यांनी दिलेल्या पशुसेवेबाबत आकारावयाची फी -

सदर महिला पशुसंवर्धन ग्रामसंपर्क कार्यकर्ती यांनी खालील पशुसेवा दयावयाच्या आहेत व त्यासाठी आकारावयाची फी खालीलप्रमाणे-

१. किमान तंत्रज्ञानावर आधारित प्रात्यक्षिके

| | |
|---|---|
| - स्वच्छ गोठा व्यवस्थापन व शेणाची जैविक विल्हेवाट - | प्रति शेतकरी रु. १०/- |
| - वाळवीचा कोंबड्यांचे खाद्य म्हणून उपयोग करणे- | प्रति शेतकरी रु. १०/- |
| - खाण्यायोग्य शेवाळ उत्पादन कार्यक्रम | प्रति शेतकरी रु. १०/- |
| - सफल अंड्यांची तपासणी करणे | प्रति ५ अंडी रु. १०/- |
| - एक दिवसाच्या पिलांचे व्यवस्थापन | प्रति शेतकरी रु. १०/- |

२. पशुसंवर्धन विषयक योजना राबविणेस सहाय्य करणे

| | |
|---|---|
| - वैरण बियाणे वाटप योजना | |
| - मोठ्या जनावरांचे लसीकरण शिबीरे | नि:शुल्क |
| - पशुसंवर्धन विषयक विविध योजनांचे लाभार्थी निवड | |
| - ग्रामसमुहात मर्तुकीविषयी माहिती देणे | नि:शुल्क |
| - सफल अंडी वाटप कार्यक्रम | प्रति अंडी रु. १/ |
| - विस्तार विषयक सर्व कामात मदत करणे | नि:शुल्क |

३. व्यवस्थापनाविषयक कामकाजाची सुची

| | |
|---|---|
| - परसातील कोंबड्यांना लसीकरण (१०० पक्षांच्या मर्यादेपर्यत) | प्रति पक्षी रु. १/- |
| - परसातील कोंबड्यांना जंतनाशके पाजणे | प्रति पक्षी रु. १/- |
| परसातील शेळ्या मेंढ्यांना जंतनाशके पाजणे | प्रति प्राणी रु. २/- |
| पक्षांचे खुराडे यांना निर्जंतुकीकरण करुन गोचीड गोमाशी निर्मुलन करणे | प्रति खुराडे रु. ५/- |
| प्राणीजन्य उत्पादीत मालाची अद्ययावत बाजाराभावांची माहिती देणे/घेणे | नि:शुल्क |
| - शेळ्या/मेंढ्यांचे परोपजिवी व बाह्य किटकांचे नियंत्रण करणे | प्रति प्राणी रु. ३/- |

सदरची फी ही शासनाच्या खाती जमा करावयाची नसून सदर फी संबधित महिला कार्यकर्तीचे अर्जित उत्पन्न राहील. जंतनाशके लसी व परोपजिवी बाहय कीटकांचे नियंत्रण करणारे औषधे इ. साठी लागणारी औषधे ग्रामसमूहातील पशुवैद्यकीय दवाखान्यातून पुरवठा करण्यात येईल. सदरच्या औषधांचा वापर पशुवैद्यकाच्या सल्ल्यानेच करण्यात यावा.

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

# २. अ) पशुसंवर्धन विस्तार महिला ग्रामसंपर्क कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देणे

प्रस्तावना-

जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने महाराष्ट्र कृषी स्पर्धाक्षम प्रकल्पांतर्गत पशुसंवर्धन क्षेत्रामध्ये पशुसंवर्धन विस्तार महिला ग्रामसंपर्क कार्यकर्त्यांना प्रशिक्षण उपघटकाची अंमलबजावणी प्रकल्प कालावधीत करण्यात यावी. या उपघटकाची अंमलबजावणी करताना कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देणे हा महत्वाचा भाग आहे. सदरील प्रशिक्षण हे तालुका पातळीवर कृषि चिकित्सालयावर आयोजीत करण्यात यावे. सदरील प्रशिक्षण हे तीन दिवसाचे राहील आणि आत्मा यंत्रणा व पशुसंवर्धन विभाग यांचेमार्फत संयुक्तरित्या देण्यात यावे.

उपघटकाचे कार्यक्षेत्र व अंमलबजावणी कालावधी

महाराष्ट्र कृषि स्पर्धाक्षम प्रकल्पांतर्गत राज्यातील मोठ्या जनावरांचे २० बाजार व शेळ्या मेंढ्यांच्या चार बाजाराचे बळकटीकरण/आधुनिकीकरण सन २०११-१२ ते २०१५-१६ या कालावधीत करण्यात येणार आहे. जनावरांच्या या बाजाराच्या लाभक्षेत्रातील जिल्ह्यात प्राधान्याने जनावरांच्या बाजाराच्या नजीकचे तालुके अथवा ज्या ठिकाणी शेळ्या-मेंढ्यांची संख्या पुरेशा प्रमाणात असेल अशा ठिकाणी पशुसंवर्धन विस्तार महिला ग्रामसंपर्क कार्यकर्त्यांची निवड करण्यात यावी. अशा रितीने प्रकल्प कालावधीमध्ये एकुण २५०० महिला ग्रामसंपर्क कार्यकर्त्यांची निवड करण्यात यावी. त्यांना तीन दिवसांचे प्रशिक्षण देण्यात यावे.

उपघटकाचे स्वरूप

जिल्हा स्तरावरील समितीने अंतिमत: निवड केलेल्या ग्रामसंपर्क कार्यकर्त्यांचे तीन दिवसाचे प्रशिक्षण शिबीर तालुका पातळीवर पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी कृषि चिकित्सालयावर अथवा नजीकचे कृषि विज्ञान केंद्र येथे आयोजित करावे. हे प्रशिक्षण गटांना देण्यात यावे. प्रशिक्षणाची अंमलबजावणी तालुक्यातील पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती, पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकीय दवाखना श्रेणी- १ व तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक (आत्मा) यांनी संयुक्तरित्या करावी . या प्रशिक्षणात शिकविण्यात येणा-या विषयांचे व प्रशिक्षणाचे वेळापत्रक सोबत जोडले आहे. याप्रमाणे ४०% लेखी व ६०% प्रात्यक्षिके याप्रमाणे प्रशिक्षण देण्यात यावे. ज्यामध्ये पशुधन व्यवस्थापन कौशल्य सुधारणा, क्षमतावर्धन किमान तंत्रज्ञानावर आधारीत पध्दतीचा अभ्यास, पशुसंवर्धन खात्याच्या विविध योजना इत्यादींचा समावेश राहील. तसेच प्रशिक्षणार्थींचे अनुभव कथन लेखी स्वरूपात घेण्यात यावे.

अंदाजपत्रक

| सदर प्रशिक्षण शिबीरासाठी प्रती प्रशिक्षणार्थी १५००/- तरतूद करण्यात आलेली असून हा निधी अर्थसंकल्प वितरीत प्रणालीव्दारे संबधित जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचेकडे वितरीत होणार आहे. त्या प्रित्यर्थ करावयाच्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे. | | |
|---|---|---|
| बाब | युनिट कॉस्ट (रूपये) | एकुण खर्च (रू) |
| दैनंदिन भत्ता (जेवण, चहा, नाष्टा) | १५०/- | ४५०/- |
| प्रवास भत्ता | २५० /- | २५०/- |
| लेखन साहीत्य | १००/- | १००/- |
| माहीती पुस्तिका, छापील साहीत्य व सीडी इ | २५०/- | २५०/- |
| प्रसिध्दी / प्रचार | ५०/- | ५०/- |
| अभ्यास दौरा | ३००/- | ३००/- |
| प्रशासकीय खर्च (प्रमाणपत्र, ओळखपत्र *) | १००/- | १००/- |
| एकूण | | १५००/- |

* प्रमाणपत्र व ओळखपत्र जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांच्या स्वाक्षरीने देण्यात यावी.

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

वर्षनिहाय प्रस्तावित प्रशिक्षणाच्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे राहील.

| वर्ष | तरतूद (रुपये लाखात) | महिला कार्यकर्त्यांची संख्या. |
|---|---|---|
| सन २०११-१२ | ०२.२५ | १५० |
| सन २०१२-१३ | ०३.०७५ | २०५ |
| सन २०१३-१४ | ०४.५० | ३०० |
| सन २०१४-१५ | १३.८६ | ९२४ |
| सन २०१५-१६ | १३.८१५ | ९२१ |
| एकुण:- | ३७.५० | २५०० |

संनियंत्रण

जिल्हास्तरावर या उपघटकाचे संनियत्रण जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी करावे. या उपघटकाची अंमलबजावणी पशुधन विकास अधिकारी, विस्तार, पंचायत समिती व पशुवैद्यकीय दवाखना तसेच तालुका तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक (आत्मा) यांनी संयुक्तरित्या करावी. व अंमलबजावणी अहवाल सादर करावा.

फलनिष्पत्ती

या प्रशिक्षणाचा उपयोग महिला कार्यकर्त्यांमार्फत पशुसंवर्धनाच्या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी होईल. पशुसंवर्धन विस्तार महिला ग्रामसंपर्क कार्यकर्त्यांना करावयाच्या कामाबाबतची परिपूर्ण माहीती प्राप्त होईल तसेच स्वयंपूर्णतेसाठी कराव्या लागणा-या कामाची ओळख होईल. अशा प्रकारे प्रकल्प कालावधीत पशुसंवर्धन ग्राम विस्तार संघ स्थापनेचे उद्दिष्ट पूर्ण करता येईल.

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

२. ब) पशुसंवर्धन विस्तार महिला ग्रामसंपर्क कार्यकर्ती प्रशिक्षण कार्यक्रम वेळापत्रक

प्रशिक्षणाचा कालावधी - तीन दिवस

प्रशिक्षणाचे ठिकाण - नजीकचे कृषि विज्ञान केंद्र अथवा तालुका पातळीवरील कृषि चिकित्सालय

प्रशिक्षणाचे आयोजक - जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त / पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती / पशुधन विकास अधिकारी तालुका पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी - १ / तालुका पातळी वरील तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक (आत्मा) अधिकारी

पहिला दिवस

| वेळ | विषय |
|---|---|
| ९.०० ते ९.३० | प्रशिक्षणार्थींची नाव नोंदणी |
| ९.३० ते १०.०० | प्रशिक्षण रूपरेषा व ग्रामसमुह सुधारणा पध्दत (Cluster Village Approach) |
| १०.०० ते १०.१५ | चहापान |
| १०.१५ ते ११.३० | पशुसंवर्धन विस्तार महिला ग्रामसंपर्क कार्यकर्ती योजनेची माहीती, शेळ्या / मेंढ्यांचे व्यवस्थापन शेळ्या / मेंढ्यांच्या विविध जाती बंदीस्त शेळीपालन /अर्धबंदीस्त शेळीपालन , पारंपारीक शेळी/मेंढीपालन |
| ११.३० ते १२.३० | शेळ्या/ मेंढ्यांचे लसीकरण (प्रात्यक्षिके), जंतनाशक पाजणे/ शेळ्या - मेढ्यांची हाताळणीची पध्दत, शेळ्या - मेढ्यांच्या शरीराची शास्त्रीय माहिती |
| १२.३० ते १३.०० | जेवणाची सुट्टी |
| १३.०० ते १४.०० | मटण निर्मितीसाठी शेळ्या मेंढ्याचे व्यवस्थापन व मटण, दुध देणा-या शेळ्या - मेढ्यांच्या जातींची माहिती |
| १४.०० ते १५.०० | जनावरांच्या बाजारांविषयीची माहिती , बाजारभाव, पशुजन्य वस्तुंची विपणन व्यवस्था, जनावरांच्या किंमती, पक्ष्यांच्या किंमती शेळ्या - मेंढ्यांच्या किंमतीच्या माहितीची देवाण घेवाण करण्याच्या पध्दतींबाबत माहिती |
| १५.०० ते १५.१५ | चहापान |
| १५.१५ ते १६.०० | कोंबडी खत/ विष्टा/ शेण/ लेंढया यांचे जैवीक व्यवस्थापन , गोबर गॅस, कंपोस्ट खत, गांडुळ खत निर्मिती, .अझोला शैवाल निर्मीतीचे प्रात्यक्षीक, |
| १६.०० ते १७.३० | शेळ्या - मेढ्यांतील बाह्य परजीवीं नियंत्रण पध्दती प्रात्यक्षिक, शेळीपालन व पक्षीपालन यावरील माहीतीपट दाखविण्यात येतील, शासनाच्या विविध योजना व त्यामध्ये लोकांचा सहभाग |

दुसरा दिवस

| वेळ | विषय |
|---|---|
| ९.०० ते ९.३० | शेळ्या - मेढ्यांतील बाह्य परजीवींचे नियंत्रण, गोचीड, गोमाशी, उवा इत्यादी. |
| ९.३० ते १०.०० | शेळ्या - मेढ्यांचे सांसर्गिक रोग, पर्यावरण संरक्षण, किड नियंत्रण तसेच पर्यावरणासंबधी घ्यावयाची काळजी |

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

| | |
|---|---|
| १०.०० ते १०.१५ | चहापान |
| १०.१५ ते ११.०० | शेळया - मेढ्यांचा आहार / खाद्य- चारा व्यवस्थापन व कुरणाचे व्यवस्थापन तसेच खाण्यायोग्य शैवाल निर्मिती पध्दत ( अझोला उत्पादन) हिरव्या चा-याची माहिती व उत्पादन पध्दती |
| ११.०० ते १२.३० | महिला ग्रामसंपर्क कार्यकर्त्यानी ठेवण्याची माहिती व मासिक प्रगती अहवाल देण्याची पध्दती , माहिती तंत्रज्ञान विषयीची माहिती , सरल भ्रमण संदेश तसेच पशुसंवर्धन विस्तार महिला ग्रामसंपर्क कार्यकर्तीने करावयाच्या विविध कामांची माहिती व पध्दती व स्वयंपूर्णता |
| १२.३० ते १३.३० | जेवणाची सुट्टी |
| १३.३० ते १७.३० | नजिकच्या कुक्कुटपालन प्रक्षेत्राला भेट अथवा अंशत: बंदीस्त शेळीपालन फार्मला भेट अथवा जनावरांच्या बाजाराला भेट (अभ्यास दौरा) |

तिसरा दिवस

| वेळ | विषय |
|---|---|
| ९.०० ते ९.३० | पक्षांच्या / कोंबड्यांचा विविध जाती (अंडी देणारे व मांसासाठीचे ) |
| ९.३० ते १०.०० | पिलांचे व्यवस्थापन / पक्षांच्या घरांविषयीची माहीती पक्षी पाळावयाच्या सुधारीत व पारंपारीक पध्दती , कोंबड्यांच्या पिलांचे व्यवस्थापन (१ दिवस ते ८ आठवडे) |
| १०.०० ते १०.१५ | चहापान |
| १०.१५ ते ११.३० | ८ ते १८ आठवडे वाढणारे पक्षी (ग्रोअर) व अंडी देणा-या पक्षांचे (१८ ते ७२ आठवडे) व्यवस्थापन, पक्षी खाद्या विषयीची माहिती व खाद्यप्रकार, खाद्यनिर्मीती सुत्र विविध घटकांची माहिती |
| ११.३० ते १२.३० | अंडी उबविण्याच्या पध्दती व सफल अंड्याची तपासणी / पक्षांना लागणारे भांड्या विषयीची माहीती, पक्षांचे विविध रोग ,बर्ड फ्लू विषयीची विशेष माहिती |
| १२.३० ते १३.०० | जेवणाची सुट्टी |
| १३.०० ते १४.०० | पक्षातील बाह्य परजीवींचे नियंत्रण, गोचीड, गोमाशी, उवा, पिसांचे इत्यादी. पक्षी घरातील स्वच्छता / फवारणी / पूर्वतयारी,पक्ष्यांचे लसीकरण पध्दती व वेळापत्रक |
| १४.०० ते १५.०० | प्रात्यक्षिके सफल अंड्याची तपासणी, एक दिवसाच्या पिलांचे व्यवस्थापन (ब्रुडर पध्दत) कुक्कुट पक्ष्यांतील लासोटा लसीकरण पध्दतीचे प्रात्यक्षीक , लस साठवणुकीची पध्दत<br>पक्षातील परोपजीवांचे नियंत्रण पध्दतीने प्रात्यक्षिक (जंतनाशके पाजणे - पाण्यातून अथवा खाद्यातून) |
| १५.०० ते १५.१५ | चहापान |
| १५.१५ ते १६.०० | वाळवीचा कोंबड्यांना खाद्य म्हणून उपयोग, शासनाचे कुक्कुट पालन धोरण व विविध योजना, प्रात्यक्षिकांचे आयोजन कसे करावे तसेच पशुसंवर्धन विस्तार विषयीची माहिती |
| १६.०० ते १७.०० | अंडी व मांसल कोंबड्याचे व्यवस्थापन, स्वच्छ दुध उत्पादन संकल्पना, स्वच्छ मांस / अंडी उत्पादन संकल्पना, जनावरे व पक्षांपासून मानवास होणारे रोग व सार्वजनिक आरोग्य |
| १७.०० ते १८.०० | भारतीय पशुचिकित्सा परिषद कायदा १९८४, कलम (30B)अंतर्गत नमूद केलेल्या तरतूदींचे पालन करणे व अनुभव कथन / लेखन / शंका समाधान, प्रमाणपत्र वाटप |